मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 06 फेब्रुवारी 2026 | पान- 1


# महापौरपदावर आज शिक्कामोर्तब

## पिंपरी चिंचवडच्या महापौरपदाची निवड प्रक्रिया सकाळी 11 वाजता विशेष सभेचे आयोजन केले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडच्या महापौरपदाची निवड प्रक्रिया शुक्रवारी (ता. ६) होणार आहे. त्यासाठी सकाळी ११ वाजता विशेष सभेचे आयोजन केले आहे. मात्र, महापौरपदासाठी भारतीय जनता पक्षाचे रवी लांडगे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज असल्याने ते बिनविरोध ठरले आहे. त्यांच्या नावावर विशेष सभेच्या माध्यमातून शिक्कामोर्तब होणार आहे.

महापालिकेत फेब्रुवारी २०१७ मध्ये निवडून आलेल्या सभासदांची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली. कोरोना प्रतिबंधक नियमावली, इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा न्यायप्रविष्ट मुद्दा आणि राज्यातील बदलती राजकीय समीकरणे आदी कारणांमुळे निवडणूक लांबणीवर पडली होती. अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३२ प्रभागांतील १२८ जागांसाठी निवडणूक झाली आहे. त्यात ८४ जागांवर विजय मिळवून भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे. शिवाय, भाजप पुरस्कृत एका अपक्षानेही विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ आणि शिवसेनेला सहा जागा मिळाल्या आहेत. आता शुक्रवारी ( महापौर आणि उपमहापौरपदाची निवड होणार आहे. त्याचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार विशेष सर्वसाधारण सभा होणार आहे. महापौरपदासाठी लांडगे यांचा एकमेव अर्ज दाखल आहे. त्यावर निवड प्रक्रिया होऊन केवळ विजयी घोषणा बाकी आहे.



### सभागृह चार वर्षांनी सज्ज

» महापालिका सभागृहातील यापूर्वीची शेवटची सभा २० जानेवारी २०२२ रोजी झाली आहे. १४ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून आयुक्त कारभार पाहत आहेत. आता निवडणूक झाल्याने शुक्रवारी (ता. ६) महापौर व उपमहापौर निवड होणार आहे. त्यासाठी महापालिकेची सर्वसाधारण सभेचे ठिकाणी अर्थात यशवंतराव चव्हाण सभागृह सज्ज झाले आहे. १२८ नगरसदस्यांसह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची आसनव्यवस्था सभागृहात आहे. अर्धवर्तुळाकार सभागृहात पीठासीन अधिकारी, महापालिका आयुक्त व नगरसचिवांसाठी आसनव्यवस्था आहे. पीठासीन अधिकाऱ्यांच्या उजव्या बाजूस नगरसचिव आणि डाव्या बाजूस आयुक्तांचे आसन असते.

### उपमहापौरपदासाठी राष्ट्रवादी लढणार, की माघार?

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या १२८ पैकी ३७ जागा जिंकून राष्ट्रवादी काँग्रेस द्वितीय क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. राज्य व केंद्र सरकारमध्ये मित्रपक्ष असलेले भाजप व राष्ट्रवादीने महापालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढली. यात सहा जागा मिळवलेल्या शिवसेनेचाही समावेश आहे. आता राष्ट्रवादीने महापौरांऐवजी उपमहापौरपदासाठी उमेदवार दिला आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेविका वैशाली काळभोर यांनी भाजपच्या शर्मिला बाबर यांच्या विरोधात अर्ज दाखल केला आहे. मात्र, ही निवडणूक लढवायची की ऐनवेळी माघार घ्यायची? याबाबत राष्ट्रवादीने गुरुवारी (ता. ५) सायंकाळपर्यंत भूमिका स्पष्ट केलेली नव्हती. राष्ट्रवादीचे नवनिर्वाचित गटनेते तथा विरोधी पक्षनेतेपदी निवड झालेले भाऊसाहेब भोईर यांनी सत्तेत सहभागी होणार नसल्याचे सुतोवाच दिले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस महापालिकेत विरोधी पक्षाच्या भूमिकेत असेल, असे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ते उपमहापौरपदाच्या निवडणुकीतून माघार घेणार नाहीत, असे दिसते.

“ उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ही निवडणूक लढवायची की माघार घ्यायची, याबाबत निर्णय झालेला नाही. त्यासाठी गुरुवारी रात्री उशिरा बैठक होईल. निवड प्रक्रियेदरम्यान आमची भूमिका जाहीर करू.

- योगेश बहल, अध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस, पिंपरी चिंचवड,

# निगडी येथे मेट्रो प्रकल्पाच्या रात्रीच्या कामामुळे नागरिक त्रस्त

## रात्री 10 ते सकाळी 6 काम बंद ठेवण्याची मागणी, नागरिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम सध्या मुंबई-पुणे महामार्गावरील निगडी बस स्टॉप परिसरात सुरू असून, या ठिकाणी पोकलँड मशीनच्या सहाय्याने रस्त्यावर खड्डे खोदण्याचे काम रात्रीच्या वेळेत सुरु आहे. या कामामुळे मोठ्या प्रमाणात आवाज होत असून आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेत सुरू असलेल्या या कामामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच विद्यार्थी वर्ग त्रस्त झाला आहे. सध्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा जवळ




आल्या असून, या गोंगाटाचा त्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

या प्रकरणी नागरिकांच्या वतीने 112 क्रमांकावर तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलीस कंट्रोल रूम व पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांच्याकडेही लेखी तक्रार देण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ता सचिन काळभोर यांनी पुणे मेट्रो प्रकल्पाचे अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी या विषयाकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे.

निगडी बस स्टॉप परिसरात सुरू असलेले रस्ते खोदण्याचे मेट्रो प्रकल्पाचे काम रात्री 10 ते पहाटे 6 वाजेपर्यंत बंद ठेवावे, जेणेकरून नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागणार नाही, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास मेट्रो प्रकल्पाच्या कामाविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# देहूत अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे विसर्जन

## इंद्रायणी नदीत आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते विसर्जन



**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूकरांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या अस्थी कलशाचे देहूतील इंद्रायणी नदीत आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते विसर्जन करण्यात आले.

मावळ तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, गणेश ढोरे, शिवाजी महाराज मोरे, मुख्याधिकारी चेतन कोंडे, मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार महिलाध्यक्षा रत्नमाला करंडे, विकास कंद, कृष्णा परंडवाल, अशोक मोरे, सुनीता टिळेकर, माऊली काळोखे, राष्ट्रवादी काँग्रेस चे शहराध्यक्ष विवेक काळोखे, सचिन शिंदे, प्रदीप काळोखे, सोमनाथ चव्हाण आदींसह इतर उपस्थित होते.

# तीन आरोग्य केंद्रांना एनक्यूएएस राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र

## महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरण्याचा मान, आरोग्य सेवांवर नागरिकांचा विश्वास अधिक दृढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या थेरगाव, जिजामाता आणि नेहरूनगर या तीन शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनक्यूएएस) राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे. हे मानांकन मिळवणारी पिंपरी-चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे.

या प्रमाणपत्रामुळे वैद्यकीय विभागाच्या गुणवत्तापूर्ण सेवांची राष्ट्रीय स्तरावर नोंद झाली आहे. नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांच्या विश्वासार्हतेलाही अधिक बळ मिळाले आहे. एनक्यूएएस हे संक्रमण नियंत्रण, क्लिनिकल केअर, रुग्ण हक्क, रुग्णालय व्यवस्थापन व सेवा सुधारणा अशा महत्त्वपूर्ण निकषांवर आधारित असते. या सर्व निकषांची पूर्तता करत संबंधित केंद्रांनी आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत आपला उच्च दर्जा सिद्ध केला आहे.



महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य सुविधा केंद्रांना हे यश मिळवून देण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे व शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. कोमल बनसोडे आणि संपूर्ण पथकांने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. डॉ. छाया शिंदे व डॉ. शैलजा भावसार यांचे सहकार्य लाभले.

सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, सेवा-सुविधा व बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट या प्रक्रियांना जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) आणि भारत सरकारच्या मानकांनुसार काटेकोरपणे अंमलात आणले जाते. नियमित निर्जंतुकीकरण, प्रतीक्षालयांची स्वच्छता, ओपीडी व्यवस्थापन व सुरक्षित उपचार वातावरणामुळे महापालिकेच्या आरोग्य सुविधांवर नागरिकांचा विश्वास वाढत आहे.

महापालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र हे वैद्यकीय विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे. नागरिकांना उच्च दर्जाची, सुरक्षित व रुग्ण-केंद्रित सेवा देण्याचा आमचा संकल्प यामुळे अधिक दृढ झाला आहे, असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

### आरोग्य केंद्रांना मिळालेले यश अभिमानास्पद

» भारत सरकारतर्फे मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र (एनक्यूएएस) हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य सेवेत सातत्याने होत असलेल्या सुधारणा व गुणवत्तेच्या बांधिलकीचे द्योतक आहे. महापालिकेच्या आरोग्य सुविधा केंद्रांनी मिळवलेले हे यश संपूर्ण शहरासाठी अभिमानास्पद आहे, असे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले.

### नागरिकांना उच्च दर्जाची सेवा

» 'महापालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र हे वैद्यकीय विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे. नागरिकांना उच्च दर्जाची, सुरक्षित व रुग्ण-केंद्रित सेवा देण्याचा आमचा संकल्प यामुळे अधिक दृढ झाला आहे, असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

### आरोग्य सुविधांवर नागरिकांचा विश्वास

» सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, सेवा-सुविधा व बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट या प्रक्रियांना जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) आणि भारत सरकारच्या मानकांनुसार काटेकोरपणे अंमलात आणले जाते. नियमित निर्जंतुकीकरण, प्रतीक्षालयांची स्वच्छता, ओपीडी व्यवस्थापन व सुरक्षित उपचार वातावरणामुळे महापालिकेच्या आरोग्य सुविधांवर नागरिकांचा विश्वास वाढत आहे.

# चिखलीतील आरक्षित भूखंडाचा गैरवापर ; महापालिकेने कचऱ्याचे डेपो केले मैदान

## खेळाडूंचा सराव बंद, रहिवाशांच्या आरोग्याला धोका; तातडीच्या कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका आता चिखलीतील उदयोन्मुख खेळाडू आणि स्थानिक रहिवाशांना बसू लागला आहे. पिंगळे रोडवरील इम्पेरियल हॉस्पिटलसमोरील गट क्रमांक 1193/7 हा भूखंड महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार पार्किंगसाठी आरक्षित असला, तरी प्रत्यक्षात मात्र प्रशासनाने या जागेचा वापर अडगळीचे सामान टाकण्यासाठी सुरू केला आहे.

या ठिकाणी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने राडारोडा, जुने फ्लेक्स आणि भंगार साहित्य टाकल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. चिखली परिसरात खेळासाठी हक्काचे एकही मैदान उपलब्ध नसताना मुले ज्या जागेवर कबड्डी आणि इतर खेळांचा सराव करत होती, तिथे आता घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सभोवताली रहिवासी परिसर आहे. या मोकळ्या जागेत कचरा साचतो.



पावसाळ्यात या परिसरात डासांचे प्रादुर्भाव वाढतो. दुर्गंधी पसरते. यामुळे नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. इतकेच नव्हे, तर या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सापांचा वावर वाढल्यानेचेही स्थानिक नागरिक सांगतात.

समस्येबाबत माजी नगरसेवक विकास साने, लोकप्रतिनिधी यश साने, संगीता नानी ताम्हाणे यांनी वारंवार महापालिका प्रशासनाशी पत्रव्यवहार करून प्रत्यक्ष संवाद साधला आहे. प्रशासनाकडून याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. याबाबत तातडीने उपाययोजना राबवल्या जातील, असे आश्वासन दिले होते,

### प्रशासनाचे दुर्लक्ष

» या गंभीर समस्येबाबत माजी नगरसेवक विकास साने, लोकप्रतिनिधी यश साने, संगीता नानी ताम्हाणे यांनी वारंवार महापालिका प्रशासनाशी पत्रव्यवहार करून प्रत्यक्ष संवाद साधला आहे. मात्र, प्रशासनाकडून याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. याबाबत तातडीने उपाययोजना राबवल्या जातील, असे आश्वासन दिले होते, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थे आहे. प्रशासनाच्या या आडमुठ्या धोरणामुळे चिखलीतील गुणवंत खेळाडूंना सरावापासून वंचित राहावे लागत असून, एका आरक्षित भूखंडाचे रूपांतर डम्पिंग ग्राऊंडमध्ये झाल्याने स्थानिक रहिवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

> याबाबत लवकरात लवकर माहिती घेतली जाईल आणि संबंधित समस्येवर तोडगा काढण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जातील. नागरिकांची गैरसोय होऊ देणार नाही.
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त**

# पुण्यातील पाणीगळती थांबणार ? महापालिकेने केले जाहीर ..

## जुन्या टाक्यांची दुरुस्ती, नवीन टाक्यांची बांधणी करण्याबरोबरच पाण्याची गळती शोधण्यासाठी रोबोसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न केला जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुरेशा पाण्यापासून वंचित असलेल्या पुणेकरांना पुन्हा एकदा पाणीगळती रोखण्याचे आश्वासन महापालिका प्रशासनाने दिले आहे. जुन्या टाक्यांची दुरुस्ती, नवीन टाक्यांची बांधणी करण्याबरोबरच पाण्याची गळती शोधण्यासाठी रोबोसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रशासन करणार आहे. या उपाययोजनांनंतर तरी किमान पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा नागरिक बाळगून आहेत.

पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, 'शहरातील अनेक भागांत आजही पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही. जुन्या आणि खराब झालेल्या जलवाहिन्यांमुळे पाणीपुरवठा करताना अनेक अडचणी निर्माण होतात. यावर मात करण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या टाक्यांची दुरुस्ती, नवीन टाक्यांची बांधणी करण्याबरोबरच पाण्याची गळती शोधण्यासाठी रोबोसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.'




### शहरातील सर्वात मोठी पाण्याची टाकीही सुरू होण्याच्या मार्गावर

**» 'धायरीतील काही उच्चदाब क्षेत्रांमध्ये काही सुधारणा केल्या जात आहेत. इंद्रप्रस्थ, हडपसर बस डेपो-२, तुकाई टेकडी, माणिकबाग आणि क्रिसेंट एक येथील टाक्या लवकरच कार्यान्वित होणार आहेत. तसेच, फर्ग्युसन टेकडीवरील शहरातील सर्वात मोठी पाण्याची टाकीही सुरू होण्याच्या मार्गावर आहे. या टाकीचा फायदा टेकडी परिसरासह मध्यवर्ती पेठांनाही होईल,' असा दावा जगताप यांनी केला.**

'शहरातील सर्व भागातील नागरिकांना एकसमान पाणीपुरवठा व्हावा, यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. आजही शहरातील काही भागांतील जलवाहिन्या जुना आणि खराब झाल्याने त्यामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याचे समोर आले आहे. त्यावर आवश्यक त्या उपाययोजना प्रशासनाने सुरू केल्या आहेत,' असे सांगून जगताप म्हणाले, 'पाषाण लिंक रोड परिसरात असलेल्या इंग्रजांच्या काळातील पाण्याच्या टाकीची क्षमता आणि संरचना कमकुवत झाली होती. या टाकीतून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याने दररोज सुमारे चार एमएलडी पाणी वाया जात होते. महापालिकेने यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व सुधारणा केल्यानंतर ही गळती थांबली.'

'बोपोडी परिसरातील भोईटे वस्तीमध्ये पाण्याची टंचाई जाणवत असल्याने नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा आणि नव्या जोडण्यांमुळे या भागातील टँकरची मागणी आता कमी झाली आहे. तसेच, कात्रज-कोंढवा परिसरातील जलवाहिनीत नवीन बदल करण्याचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर येथील पाण्याचा दाब आणि उपलब्ध होणारे पाणी यामध्ये बदल होईल. हांडेवाडी भागात आतापर्यंत दिवसाआड पाणीपुरवठा केला जात होता. भुजबळ टाउनशिप येथील नव्या टाकीमुळे आता या भागात दररोज पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.'

### '३५ हजार मीटर बसविण्याचे काम बाकी'

**» 'शहरात ३५ हजार मीटर बसविण्याचे काम अद्याप बाकी आहे. हे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. नव्या नियोजनामुळे जलवाहिन्यांची एकूण लांबी कमी करण्यात आली असून, यामुळे देखभाल खर्चात बचत होऊन पाण्याचा दाब अधिक प्रभावीपणे नियंत्रित करता येणार आहे. हे जलमीटर बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाण्याचा दाब वाढणार आहे,' अशी माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली.**

### पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा

**» 'बोपोडी परिसरातील भोईटे वस्तीमध्ये पाण्याची टंचाई जाणवत असल्याने नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा आणि नव्या जोडण्यांमुळे या भागातील टँकरची मागणी आता कमी झाली आहे. तसेच, कात्रज-कोंढवा परिसरातील जलवाहिनीत नवीन बदल करण्याचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर येथील पाण्याचा दाब आणि उपलब्ध होणारे पाणी यामध्ये बदल होईल.**

# पुण्यातील जमीन व्यवहार प्रकरणी खारगे समितीचा अहवाल समोर

## पुण्यातील मुंढवा जमीन व्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांना क्लीन चीट मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा येथील महार वतन जमीन खरेदी गैरव्यवहारात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचे कुठेही नाव नसल्याचे महसूल विभागाचे अतिरिक्त सचिव विकास खारगे यांच्या समितीच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या व्यवहारात नाव किंवा स्वाक्षरी नसल्याने पार्थ पवार यांना 'क्लीन चिट' मिळाली आहे.



या जमीन व्यवहारात प्रत्यक्ष सहभागी असलेले अमेडिया कंपनीचे संचालक दिग्विजय पाटील, कंपनीला जमीन विक्री करणाऱ्या शीतल तेजवानी आणि संबंधित नोंदणी अधिकारी यांना दोषी धरण्यात आले असून अमेडिया कंपनीकडून व्यवहाराचे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क सूल करावे, अशी शिफारस अहवालात करण्यात आली आहे.

अमेडिया कंपनीत पार्थ पवार यांची भागीदारी असून कंपनीने १,८०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेली महार वतनाची ४० एकर जमीन अवघ्या ३०० कोटींना खरेदी केल्याचा गैरव्यवहार नोव्हेंबर महिन्यात उघडकीस आला. आयटी पार्क उभारण्यात येणार असल्याचे सांगून कंपनीने २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्कही माफ करून घेतले होते.. मुळात सरकारी जमिनीची खरेदी-विक्री होत नसताना या जमिनीचा व्यवहार झालाच कसा यावरून पार्थ पवार यांच्यावर आरोप-प्रत्यारोप झाली. याप्रकरणी तहसीलदार सूर्यकांत येवले, उपनिबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले. तहसीलदार सूर्यकांत येवले आणि रवींद्र तारू यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याचप्रमाणे खरेदी-विक्रीतील शीतल तेजवानी यांनाही अटक करण्यात आली. या प्रकरणाच्या चौकशीसाठी महसूल विभागाचे आतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीत पुणे विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, पुणे जिल्हाधिकारी यांचा समावेश होता. समितीने या प्रकरणात अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत अमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय पाटील, शीतल तेजवानी, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यासह उद्योग विकास आयुक्त, 'बॉटिनिकल सर्व्हे ऑफ इंडिया'चे अधिकारी, जमाबंदी आयुक्त पुणे, नोंदणी महानिरीक्षक आणि उपनिबंधक यांना मंत्रालयात पाचारण करून चौकशी केली. चौकशी समितीसमोर अमेडिया कंपनी आणि तेजवानी यांच्यावतीने वकिलांनी बाजू मांडली.

### पार्थ पवार यांना दुहेरी दिलासा

**» मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात पोलिसांनी सादर केलेल्या आरोपपत्रात पार्थ पवार यांचे नाव नाही. त्यापाठोपाठ सरकारने नेमलेल्या समितीच्या अहवालातही पार्थ पवार यांचा उल्लेख नाही. त्यामुळे पार्थ पवार यांना या गैरव्यवहारातून दुहेरी दिलासा मिळाला आहे. मात्र अमेडिया कंपनी ही एलएलपी ( लिमिटेड लायबलिटी पार्टनरशिप ) कायद्यानुसार नोंदली गेलेली असल्याने कंपनीचे सर्व भागीदार यात दोषी ठरतात, अशी माहिती या क्षेत्रातील जाणकारांनी दिली.**

# मुंबई पुणे द्रुतगती मार्गिकेवरील वाहतूक अखेर सुरु

## मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघातग्रस्त टँकर अखेर बाजूला करण्यात यंत्रणांना यश आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रवाशांच्या अडचणी थांबण्याचे नाव घेत नाहीत. खंडाळा घाटातील अडथळे दूर होऊन ३२ तासांनंतर मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरील वाहतूक पुन्हा सुरु झाली. त्यातच आता एक मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यातच आता लोणावळ्याजवळ सिमेंटचा कंटेनर बंद पडल्याने पुन्हा एकदा वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. लोणावळ्यापासून मागे तब्बल २० ते २२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याचे पाहायला मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणावळा परिसरात एक सिमेंटचा कंटेनर तांत्रिक बिघाडामुळे रस्त्यातच बंद पडला. यामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक पूर्णपणे मंदावली आहे. महामार्ग पोलीस आणि आयआरबीची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. क्रेनच्या साहाय्याने हा कंटेनर बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, तोपर्यंत वाहनांचा ओघ वाढल्याने वाहतूक कोंडीत भर पडली आहे.




### वाहनांना पुढे ढकलण्याचे प्रयत्न

**» महामार्ग पोलिसांनी या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तातडीने पावले उचलली आहेत. ते झोपलेल्या चालकांना जागे करून त्यांच्या वाहनांना पुढे ढकलण्याचे प्रयत्न करत आहेत. काही ठिकाणी पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन करून गाड्या हळूहळू पुढे सरकवल्या. आडोशी बोगद्याजवळ वाहतूक तुलनेने सुरळीत असली तरी, प्रवाशांना काही मिनिटे किंवा तासभर थांबावे लागत आहे. यामुळे व्यावसायिक वाहने, पर्यटक आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या लोकांना मोठा त्रास होत आहे. विशेषत: मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांना जोडणारा हा महामार्ग व्यावसायिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असल्याने, या अडथळ्याचा आर्थिक परिणामही होऊ शकतो.**

खंडाळा घाटातील ३२ तासांच्या खंडानंतर रात्री उशिरा वाहतूक सुरू करण्यात आली होती. मात्र, अनेक वाहनचालकांना याची कल्पना नसल्याने आणि प्रचंड कोंडीमुळे वैतागलेले चालक आपल्या वाहनातच झोपून गेले होते. सकाळी वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करताना पोलिसांना या वाहनचालकांना झोपेतून उठवून गाड्या पुढे नेण्यास सांगावे लागले.

प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करत टँकरमधील गॅस दुसऱ्या टँकरमध्ये हलवला आणि अपघातग्रस्त वाहन रस्त्यावरून हटवण्यात आले. त्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्वपदावर येऊ लागली गळतीनंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथके आणि भारत पेट्रोलियमचे तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले. पुणे ते मुंबई मार्ग काही काळ पूर्णपणे बंद ठेवण्यात आला, तर वाहतूक जुन्या महामार्गावर वळवण्यात आली. बुधवारी संध्याकाळपर्यंत वाहनांच्या रांगा सुमारे २० किलोमीटरपर्यंत पोहोचल्या होत्या. या वाहतूक कोंडीचा मोठा फटका बससेवेलाही बसला असून १६५ बसेस विविध ठिकाणी अडकल्या, तर १३९ बसफेऱ्या रद्द कराव्या लागल्या, ज्यामध्ये ई-शिवनेरी आणि नियमित बसेसचा समावेश आहे.

### मुंबईकडे जाणाऱ्या दिशेने मार्ग मोकळा

**» गॅस भरलेला एक मोठा टँकर महामार्गावर उलटला होता, ज्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली होती. बचावकार्य आणि क्रेनच्या साहाय्याने टँकर हटवण्यासाठी सुमारे दीड दिवस लागले. अखेर आज सकाळी मुंबईकडे जाणाऱ्या दिशेने मार्ग मोकळा करण्यात आला. यामुळे लाखो प्रवाशांना आणि वाहनचालकांना काहीसा दिलासा मिळाला. पण हा आनंद फार काळ टिकला नाही.**

### नेमक काय घडलं होतं?

**» दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहतूक कोंडीचा अहवाल मागितला त्यामुळे या घटनेची चौकशी होणार आहे. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील खंडाळा घाट परिसरातील आडोशी बोगद्याजवळ गॅस टँकर उलटला. टँकरमधून प्रोपीलीन गॅस गळती सुरू झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव एक्सप्रेस वेचे काही भाग तातडीने बंद करण्यात आले. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करत टँकरमधील गॅस दुसऱ्या टँकरमध्ये हलवला आणि अपघातग्रस्त वाहन रस्त्यावरून हटवण्यात आले. त्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्वपदावर येऊ लागली.**

# राजगड तालुक्यात दुबार मतदान रोखण्यासाठी कडक उपाययोजना

## जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीत पारदर्शकतेसाठी प्रशासन सज्ज; 821 दुबार मतदारांवर विशेष लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजगड तालुका निवडणूक कार्यालयाच्या वतीने मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष व विश्वासार्ह राहावी, यासाठी कडक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दुबार मतदानाचा कोणताही प्रकार घडू नये, यासाठी संपूर्ण निवडणूक यंत्रणेला सतर्क राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.




मतदार यादीतील नोंद तपासणे, वैध ओळखपत्राची खातरजमा करणे तसेच बोटावर अमिट शाई लावण्याची प्रक्रिया अत्यंत दक्षतेने राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेत कोणतीही ढिलाई होऊ नये, यासाठी मतदान केंद्रांवरील अधिकारी व कर्मचारी यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी पूर्ण सजगतेने पार पाडावी, असेही आदेश देण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणतीही संशयास्पद बाब आढळून आल्यास तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुबार मतदानाचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींवर निवडणूक कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

राजगड तालुक्यात 821 दुबार मतदार आहेत. या पार्श्वभूमीवर कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासह आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ज्या मतदारांची नावे दोन ठिकाणी आहेत, त्यांना प्रशासनाने एक संधी दिली आहे. संबंधित मतदारांनी आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे (इडङ्ज) संपर्क साधावा. परिशिष्ट-1 मध्ये लेखी माहिती देऊन आपण नेमके कोणत्या केंद्रावर मतदान करणार आहोत, हे स्पष्ट करावे. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे बोगस मतदानाला चाप बसण्याची शक्यता आहे.

### नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे

**» निवडणूक निर्णय अधिकारी अमिता तळेकर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसलीदार निवास ढाणे यांनी मतदारांना आवाहन करताना सांगितले की, मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे, प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने मतदान करावे. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग महत्त्वाचा आहे. शांततेत, नियमबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने मतदान प्रक्रिया पार पडण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी सजग व जबाबदार मतदारांची भूमिका अत्यंत आवश्यक असल्याचेही निवडणूक कार्यालयातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.**